## अंतरंग


शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल -राष्ट्रपती/२

पनवेल मनपाचा मालमत्ता करवसुलीचा नवा विक्रम/५

म्हसळ्यात कारच्या धडकेत महिला ठार/७


## ‘यूटीएस’वरील लोकल तिकीट बुकींग सेवा स्थगित



**मुंबई :** जीवनवाहिनी मुंबईच्या लोकल प्रवासात प्रवाशांसाठी सोयीच्या ठरणाऱ्या ‘यूटीएस’ या मोबाईल प्रणालीवरील क्यूआर कोड तिकीट आरक्षणाला ब्रेक लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेने या दोन्ही मार्गांवर पुढील सूचना मिळेपर्यंत ही सुविधा बंद करण्यात आली आहे. प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर होणारा गैरवापर रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आता मोबाईल तिकीट आरक्षण रेल्वेरूळ आणि स्टेशन परिसरापासून २० मीटरच्या भौगोलिक सीमेबाहेरच करणे शक्य होणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रवाशांकडून या प्रणालीचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. रेल्वेच्या अधिकाऱ्यांना एक अशी वेबसाईट सापडली होती, ज्यावर प्रत्येक उपनगरीय स्थानकाचे क्यूआर कोड उपलब्ध होते. प्रवासी हे कोड डाउनलोड करून, प्रिंट काढून किंवा मोबाईलमध्ये सेव्ह करून ठेवू शकत होते. यामुळे टीसी दिसताक्षणी तिकीट काढता येत होते.

# अनुकंपा तत्वावर मेगा भरती!

### राज्यात तब्बल १० हजार जागा भरल्या जाणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने अनुकंपा तत्वावर रिक्त असलेल्या १० हजार जागा भरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा भरतीचा प्रश्न मार्गी लागणार असून राज्यातील हजारो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे.



अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या भरती प्रक्रियेवर शिक्कामोर्तब झाले असून रखडलेल्या जागा भरण्याची प्रक्रिया गतीने सुरू होणार आहे. विशेष म्हणजे यामध्ये चतुर्थ श्रेणीतील अनुकंपा तत्वावरील पदेही सामाविष्ट करण्यात आली आहेत. राज्यात अशा एकूण ९,६५८ जागा रिक्त असून या सर्व पदांची भरती १५ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुकंपा तत्वावर इतक्या मोठ्या प्रमाणावर भरती होत आहे.

सरकारच्या नव्या निर्णयानुसार अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया यापुढे अधिक पारदर्शक आणि जलदगतीने राबवली जाणार आहे. या प्रक्रियेचे संपूर्ण नियोजन जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

आतापर्यंत चतुर्थ श्रेणीतील पदांची भरती ही प्रामुख्याने खासगी कंत्राटदारांमार्फत केली जात होती, मात्र अनुकंपा तत्वावर ज्या जागा प्रलंबित होत्या त्या थेट भरण्याचा निर्णय सरकारने घेतल्यामुळे यासाठी अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या जवळपास १० हजार उमेदवारांचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरू शकते.

मिळालेल्या माहितीनुसार राज्य सरकारने अनुकंपा तत्वावरील सर्व रिक्त पदे भरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केवळ पदे भरण्यावर न थांबता या नियुक्ती प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण सुधारणादेखील करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यातील शासकीय तसेच निमशासकीय संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवेत असतानाच निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबातील पात्र वारसाला त्याच विभागात नोकरी देण्याची तरतूद या धोरणात आहे. हे धोरण प्रथम १९७३ साली लागू करण्यात आले असून काळानुरूप त्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

## गणेश दर्शन



साईबाबा सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळ, पनवेल कोळीवाडा नाका येथील बाप्पा व देखावा.

## तळोजात आरोग्य केंद्राचे भूमिपूजन

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजा फेज-२ येथे बांधण्यात येणाऱ्या आरोग्य केंद्राच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ५) झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या प्रयत्नांतून महापालिकेच्या वतीने प्रभाग समित अ मधील तळोजा फेज-२ येथील से. २६, भूखंड क्र. ७ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात येणार आहे. या कामासाठी चार कोटी ४३ लाख ५० हजार ५३० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भूमिपूजन समारंभास भाजप युवा मोर्चा पनवेल उत्तर अध्यक्ष आशिष कडू, चिटणीस सागर भोईर, माजी नगरसेवक संतोष भोईर, उपाध्यक्ष निर्दोष केणी, सुरेश पोरजी, संतोष पाटील, विनोद पाटील, चिटणीस नितीन पाटील विनेश कदम, प्रभाग १चे अध्यक्ष दीपक पाटील, सचिन कोपरकर, शक्ती केंद्र प्रमुख संतोष मढवी, बूथ अध्यक्ष भूपेश चव्हाण, सचिन कोपरकर, अरुण वारे, मनोजकुमार सिंग, शाम नारायण सिंग, जयकृष्ण सिंग, अवधेश गुप्ता, सचिन सावंत, अवभा कांबळे, अजय नाईक, संजय गायकवाड, हनुमंत ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## मुंबईत मानवी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी; यंत्रणा अलर्ट



**मुंबई :** राजधानी मुंबईला पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाची धमकी पोलिसांच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर मिळाली आहे. ३४ वाहनांमध्ये मानवी बॉम्ब व ४०० किलो आरडीएक्सचा उल्लेख या संदेशात करण्यात आला आहे. अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर धमकी मिळाल्याने पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.

धमकीच्या संदेशात लष्कर-ए-जिहादी या संघटनेचे नावही घेतले गेले असून १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसले आहेत, असा दावा करण्यात आला आहे. तब्बल ३४ गाड्यांमध्ये ह्यूमन बॉम्ब लावण्यात आले असून ४०० किलो आरडीएक्सच्या स्फोटानंतर संपूर्ण मुंबई हादरून जाईल आणि त्यातून सुमारे एक कोटी लोकांचा मृत्यू होऊ शकतो, असे म्हटले आहे. या इशाऱ्यानंतर सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते फिटनेस सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुढच्या पिढ्यांना निरोगी जीवन द्यायचे असेल, तर त्यासाठी आपण फिट असणे आवश्यक आहे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोलीमध्ये फिटनेस सेंटच्या उद्घाटनावेळी व्यक्त केले.

आरोग्य आणि निरोगी जीवनसाठी समर्पित असलेले अधिराज वेलनेस आणि फिटनेस सेंटर सुलभा शेळके यांनी कळंबोली सेक्टर ११मध्ये नव्याने सुरू केले आहे. या सेंटरचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.४) झाले. या वेळी त्यांनी शेळके व त्यांच्या सहाकाऱ्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, आरोग्य सल्लागार शिवाजी गोपाळघरे, भाजप जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, माजी नगरसेवक विजय खानावकर, राजेंद्र शर्मा, रवींद्र भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, विद्या गायकवाड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते, डॉ. मारुती खामकर, अनिल कदम, सरस्वती काथारा, सुलभा खेडकर, कल्पना मोटे, संतोष सानप, मुकुंद पाटील, प्रकाश घोडके, कृष्णा पाटील, नंदकुमार शेळके आदी उपस्थित होते.

## निवडक

### केंद्रीय निवडणूक आयोगाची ४४ राजकीय पक्षांना नोटीस

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने ४४ राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांनी २०१९पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि इतर पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा केलेला नाही. या पक्षांमध्ये आम जनता पार्टीसह अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी यांसारख्या पक्षांचा समावेश आहे. त्यांच्यावर बंदी येऊ शकते.

### शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरोधात लूकआऊट नोटीस

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मुंबई पोलिसांनी ६०.४० कोटी रुपयांच्या फसवणूकप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा संबंध २०१५मध्ये सुरू झालेल्या त्यांच्या ’बेस्ट डील टीव्ही’ या कंपनीशी आहे. पोलिसांनी दोघांविरोधात लूकआउट नोटीस जारी केलीय.





**पनवेल : शिक्षक दिनानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.**

## अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान; मदतीचे आश्वासन

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा मान्सून सक्रिय झाल्याने अनेक जिल्ह्यांना पावसाचा फटका बसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार बाधित भागात सुरू केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६,११,८७२.५ एकर) बाधित झाले आहे.

## गणेश विसर्जनासाठी प्रशासनाची तयारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेले दहा दिवस उत्साहात सुरू असलेल्या गणेशोत्सवाची सांगता शनिवारी (दि. ६) अनंत चतुर्दशीला विसर्जन मिरवणुकीने होणार आहे. सर्वांनाच बाप्पाला निरोप देण्याची आतुरता आहे. या काळात भाविकांची सुविधा आणि सुरक्षेसाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे. रायगड जिल्ह्यात १६९ सार्वजनिक, तर १८ हजार ४२ खासगी गणपतींचे विसर्जन तळी, समुद्र, नदी या ठिकाणी केले जाणार आहे. विसर्जन सुरळीत व सुरक्षित व्हावे यासाठी प्रशासनाने व्यवस्था केली आहे. अलिबागमध्ये समुद्रकिनारी कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रकाशासाठी अधिकचे दिवे लावण्यात आले आहेत. निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. पालिकेचे जीवरक्षक गणेशभक्तांना विसर्जनासाठी सहकार्य करणार आहेत. समुद्रकिनारी स्वागत कक्ष उभारण्यात आला असून तेथून गणेशभक्तांना सुरक्षाविषयक सूचना दिल्या जाणार आहेत.

**राम प्रहर**

### रविवारचा अंक नाही

**अनंत चतुर्दशीनिमित्त ‘राम प्रहर’च्या कार्यालयास शनिवारी सुट्टी असल्यामुळे रविवार (दि. ७)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी व हितचिंतकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक**







# शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल -राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## महाराष्ट्रातील सहा शिक्षक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शिक्षकांचे समाजातील स्थान सर्वोच्च असून शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरण २०२० च्या अंमलबजावणीत शिक्षणाला आनंददायी बनवण्यावर भर देत बालिका शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते



महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (चडऊए) सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते.

या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

# वाशीत कागदापासून साकारलेला पर्यावरणपूरक बाप्पा ठरतोय आकर्षण

## वने व वन्यजीव वाचवण्याचा दिला संदेश



### मंडळाकडून सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन

*मंडळाकडून गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत विविध सामाजिक कार्यक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली जाते. यात मोफत आरोग्य शिबिर,मोफत नेत्रतपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, महिलांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, महिला व लहान मुलांच्या, कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन, सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रम राबवले गेले आहेत.*

**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सेक्टर १६ ए वाशी येथील गणेशाचा देखावा सध्या नागरिकांना आकर्षित करत आहे. शेषनाग डोक्यावर असलेला व भल्या मोठ्या मुषकावर स्थानापन्न झालेला बाप्पा बघताक्षणी आकर्षित करून घेतो.

यासोबत मंडपात प्रवेश करताना स्वागताला उभे असलेले हत्ती पाहता जणू कोणत्या राजे राजवाड्यांच्या दरबारात प्रवेश करत आहोत की काय असे भासते. त्यासोबत प्रवेशद्वारावर असलेले सिंह व हिरवळीचे दृश्य लहानग्यांचे मन आकर्षित करून घेत आहे. यंदा वने व वन्यजीव वाचवा असा संदेश देखाव्यातून देण्याचा प्रयत्न मंडळाने केलेला आहे. सध्या मंडळाचे ४१ वे वर्ष असून गेली चार दशके हा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो असे मंडळाचे अध्यक्ष विजय वाळुंज यांनी माहिती देताना सांगितले.

या वर्षी मंडळाने नवी मुंबईतील सर्वात मोठा जंगल सफारी देखावा उभारलेला आहे.मंडळाने यंदा पर्यावरणावर भर देताना जंगली प्राण्यांच्या संवर्धनाची जागृती केली आहे. जंगले वाचवा, जंगले वाचली तरच दुर्मिळ असलेले जंगली प्राणी वाचतील अन्यथा जंगली प्राणी आपल्याला कार्टून अथवा टिव्हीमध्येच पाहायला मिळतील असा सामाजिक संदेश या जंगलाचा देखावा उभारून दिला आहे.


जंगलाचे संवर्धन करण्यासोबत पर्यावरण जपण्याचे आवाहनदेखील मंडळाने कृतीतून दिले आहे.

# माथेरान घाटात वाहनाचा अपघात, प्रवासी सुखरूप

**माथेरान : बातमीदार**

माथेरान घाटात शुक्र. दि.५ रोजी एका नव्या कोऱ्या गाडीला अपघात झाला आहे. गाडीमधील एकूण तीन प्रवासी सुखरूप असल्याचे सांगण्यात येत आहे.

माथेरान पर्यटनस्थळी पावसाचा जोर अजूनही कायम आहे.वर्षा पर्यटनासाठी पर्यटक मोठ्या संख्येने याठिकाणी येत आहेत.विकेंडला पर्यटक घाट रस्त्याने आपल्या खाजगी वाहनाने मोठ्या प्रमाणावर येत आहे .माथेरान घाटात यंदाच्या वर्षी अपघाताची मालिकाच सुरू असल्याचे बोलले जात आहे.शुक्रवार दि.५ रोजी माथेरान घाटातील जुम्मा पट्टी भागातील रस्त्यावर



एक खाजगी वाहनाचा अपघात झाल्याची घटना घडली.

एम.एच १२ टी.सी ४६ ई या वाहनाच्या अपघात झाला असून यामध्ये एकूण तीन प्रवासी असल्याची माहिती मिळाली.तीनही प्रवासी सुखरूप असल्याचे समजते. दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या दरम्यान या गाडीचा घाटातून वर माथेरानकडे येत असताना अपघात झाला

माथेरानमध्ये पडत असलेल्या पावसामुळे रस्त्यांची वाताहत झाली असून घाटामध्ये वाहने चालविताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर नवीन वाहन चालकांना या नागमोडी घाट रस्त्याचा अंदाज नसल्याने अपघात होत असल्याचे बोलले जात आहे.

# पेणमधून १३ वर्षीय मुलास फुस लावून पळविले

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील आर पी नगर येथून १३ वर्षीय संस्कार रामकेवल चौधरी या मुलास फुस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

फिर्यादी रामकेवल चौधरी मूळ रा. उत्तर प्रदेश, सध्या पेण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचा मुलगा संस्कार (वय १३ वर्षे हा दिनांक २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता आईकडून पैसे घेऊन दुकानात जातो



असे सांगून घरातून बाहेर पडला. मात्र त्यानंतर तो परत आला नाही.

बेपत्ता मुलाचे वर्णन उंची ३ फूट ४ इंच, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, अंगात पिवळा टी-शर्ट, निळी हाफ पॅन्ट, पायात हिरव्या रंगाची चप्पल व बोलीभाषा हिंदी आहे.

# मोफत नेत्रचिकित्सा शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कर्जत आणि डॉ. सुहास हळदीपुरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १२१ रुग्णांची तपासणी करण्यात आली तर यापैकी १२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. याप्रसंगी गरजू रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात नेत्रचिकित्सा



शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विजय हरिश्चंद्रे यांच्या हस्ते शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी शिबीर संयोजक विनोद पाचघरे, वसंत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष मंगेश जोशी, अमित मराठे, अभिजीत मराठे, कौस्तुभ परांजपे, निलेश परदेशी, रघुनाथ खैरे आदी उपस्थित होते.





पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी द्विदिशा अभिषेक कारंडे हिने पुण्यात झालेल्या फहारन महाराष्ट्र एरोबिक्स आणि हिप-हॉप चॅम्पियनशिप २०२५मध्ये सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीमुळे तिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, प्राचार्य राज अलोनी, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम.के. कोगेरे यांनी द्विदिशाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी 'रयत'चे पीआरओ बाळासाहेब कारंडे, कामोठ्याच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, समन्वयिका जसबिंदर मॅडम, अनिता मॅडम उपस्थित होत्या. द्विदिशाला कांती जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



आमदार महेंद्र थोरवे, पोसरी, कर्जत



शंकर दाखिणकर, गांगवली, माणगाव



अशोक कोळी, गव्हाण, पनवेल



दिनानाथ गावंड, बारापाडा, पनवेल



पनवेल : भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी विराजमान बाप्पाचे भाजप अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, तालुका चिटणीस यतीन पाटील, सुकापूर सदस्य ग्रामपंचायत महेश पाटील, माजी उपसरपंच दिवेश भगत यांनी दर्शन घेतले.



सुभाष दाभाडे, हमरापूर, पेण



खोपोली येथील बाजारपेठ हनुमान मंदिरातील गणेशोत्सव मंडळाच्या श्री गणरायाची महाआरती करताना भारतीय जनता पक्षाचे युवा नेते विक्रम साबळे.



बाळकृष्ण सखाराम दाखिणकर, गांगवली, माणगाव



मुरुड : निलेश पुलेकर, जगन पुलेकर व राज पुलेकर यांच्या निवासस्थानी गणेशोत्सवात साकारलेली नगर परिषद शाळेची प्रतिकृती. यातून जुन्या आठवणींना उजाळा दिला गेला.









पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी परिसरातील गणरायांचे दर्शन घेतले. त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, भिमराव पोवार, सदानंद पाटील आदी उपस्थित होते.



रामश्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, नवीन पनवेल



गजानन ठाकूर, भेंडखळ, उरण



प्रकाश म्हात्रे, मुळेखंड, ता. उरण



शिवाजीनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पनवेलचा शिवाजीनगरचा राजा



दीपक पाटील, भाजप केळवणे पं.स. उपाध्यक्ष















पनवेल : माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस अमरिश मोकल, मयुरेश खिस्मतराव, महेश पाटील, शेखर मंजुळे आदींनी माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक व भाजप जिल्हा चिटणीस नितीन पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, संतोष शेट्टी, माजी नगरसेवक व कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, स्वराज्य मित्र मंडळ, साईनगरचा राजा अशा सार्वजनिक व घरगुती बाप्पांचे दर्शन घेतले.





पनवेल : माजी नगरसेवक अजय बहिरा तसेच भाजप सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते यांनी श्री गणेश जुने भाजी व फुल मार्केट, पनवेल येथे आयोजित गणेशोत्सवाला भेट देऊन बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी कार्याध्यक्ष सोमनाथ इचके व सभासदांनी स्वागत केले.



## संपादकीय

# भीषण पुराचे संकट

उत्तर भारतात गेल्या काही दिवसांपासून सततच्या मुसळधार पावसाने कहर केला असून पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि दिल्लीलाही पूरस्थितीचा सामना करावा लागतो आहे. पंजाबमध्ये युद्धपातळीवर मदतकार्य सुरू असूनही परिस्थिती अद्याप आटोक्यात आलेली नाही. पावसाचा जोर कमी झाल्यावरच परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. हा सारा हवामान बदलाचाच परिणाम असल्याचे तज्ज्ञ म्हणत आहेत.

**पंजाबमध्ये सध्या गेल्या ३७ वर्षांतील सर्वात भीषण पूरपरिस्थिती ओढवली असून भारतीय लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सीमा सुरक्षा दल आणि पंजाब पोलिस युद्धपातळीवर काम करत आहेत, पण तरीही परिस्थिती अधिकाधिक बिकट होत चालल्याचे सांगितले जाते. दरम्यान, गुरुवारी सकाळी हिमाचलमधील कुल्लूच्या मठ परिसरात भूस्खलन झाल्याने दहा जण ढिगाऱ्याखाली गाडले गेले. दिल्लीतही युमनेची पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त झाली असून नवी दिल्ली व जम्मूतही पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. हिमाचल प्रदेश आणि जम्मूकाश्मीरमधील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे सतलज, व्यास आणि रावी या नद्या ओसंडून वाहात आहेत. हा सारा हवामान बदलाचा परिणाम असल्याचे मत संबंधित तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत, तर मानवी हस्तक्षेपाचा अतिरेक झाल्याने निसर्गाचा रोष ओढवला आहे अशी भावना सर्वसामान्यांमध्ये दिसते आहे. पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमधील पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने या चारही राज्यांच्या सरकारांना तसेच केंद्र सरकारला नोटीस बजावली असून बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे ही आपत्ती ओढवली आहे अशी कडक टिप्पणी केली आहे. उत्तरेतील काही राज्यांमधील भूस्खलन आणि पुराच्या कारणांसाठी कृती आराखडा तयार करण्याची आणि एसआयटी चौकशीची मागणी एका याचिकेद्वारे करण्यात आली आहे. अशा आपत्ती पुन्हा येऊ नयेत यासाठी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे. वास्तविक रविवारपासून मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात जलपातळी प्रचंड वाढली असून पंजाबमध्ये महापुरामुळे चार लाख एकर जमीन पाण्याखाली गेली आहे. शेती व पशुधनाचे मोठे नुकसान पंजाबमध्ये झाले आहे. हजारो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून जवळपास १५ लाख लोकांना पुराचा फटका बसला आहे. पंजाब आणि जम्मूतील पुरामुळे भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवरील ११० किमीपेक्षा जास्त परिसरातील कुंपणाची हानी झाली आहे. सध्या ड्रोन, मोठ्या सर्चलाइट्स आणि बोटींद्वारे या भागात गस्त घातली जात आहे. पंजाबचे कृषीमंत्री गुरमीत सिंह खुड्डियान यांनी केंद्राकडे वाढीव भरपाई आणि आठ हजार कोटींचा निधी देण्याची मागणी केली असून केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी पूरग्रस्त जिल्ह्यांना भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला आहे. सध्याची प्रतिएकर सहा हजार ८०० रुपयांची नुकसानभरपाई वाढवून ५० हजार रुपये करण्यात यावी अशी मागणी केंद्राकडे करण्यात आली आहे. कापणीचा हंगाम काही आठवड्यांवर येऊन ठेपला असताना पंजाबमध्ये पूरस्थिती ओढवल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आम आदमी पक्षाच्या सरकारला परिस्थिती हाताळण्यात मोठे अपयश आल्याची टीका होते आहे. पंजाब सरकारने संपूर्ण राज्याला 'आपत्तीग्रस्त' घोषित केले असून केंद्राकडे तातडीच्या मदतीची मागणी केली आहे. भाक्रा बियास व्यवस्थापन मंडळावरही धरणातील पाणी वेळेवर न सोडल्याची टीका होते आहे. उत्तरेतील या राज्यांमध्ये वारंवार पूरस्थिती का उद्भवते याचा गंभीर शोध घेण्याची खरोखरच गरज आहे.**

# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले.

गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले.

गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.

### घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे

या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आजमितीस महाराष्ट्रभरातील ४०४पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत



सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या https://ganeshotsav.pldmka.co.in/ या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या श्री गणेशांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २००हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७०हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टललादेखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

### भजनी मंडळ

गणेशोत्सव काळात भजनी मंडळांचा मोठा सहभाग असतो. याच अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांना रुपये पाच कोटी अनुदान देण्याबाबतची तरतूद करण्यात आली. राज्यात १८०० भजनी मंडळे नोंदणीकृत असून त्यांना प्रत्येकी २५ हजार रूपये अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

### रील स्पर्धा

गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धेचे आयोजनदेखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास पाच हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास एक लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

### विशेष उपक्रम

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.

### जागतिक व्यासपीठ

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेरदेखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट २०२५दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी केएम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.


गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की

**-संजय डी.ओरके,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर मोठा धोका; सरकारने दिला इशारा!

भारत सरकारची सायबर सुरक्षा एजन्सी CERT-In (कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम)ने व्हॉट्सॲप युजर्ससाठी सुरक्षा अलर्ट जारी करण्यात आला. यासंदर्भात एजन्सीने स्पष्टपणे म्हटले आहे की, जर ॲप अपडेट केले नाही तर युजर्सला डेटा धोक्यात येऊ शकतो. काय दिला अलर्ट आणि काय काळजी घ्यावी लागेल ते जाणून घेऊया



या संदर्भात CERT-Inने म्हटले आहे की, व्हॉट्सॲपच्या ळजड आणि macOSमध्ये एक गंभीर त्रुटी आढळली आहे. ही त्रुटी लिंक्ड डिव्हाइस हाताळणीशी संबंधित आहे. अहवालानुसार, जर एखादा हल्लेखोर या कमकुवतपणाचा फायदा घेत असेल तर तो युजर्संना बनावट किंवा दुर्भावनापूर्ण लिंक्सवर क्लिक करायला लावून त्यांच्या खाजगी चॅट्स आणि संवेदनशील डेटामध्ये प्रवेश करू शकतो.

Netflixचा नियम आता YouTubeदेखील करणार लागू, 'या' युजर्सवर होणार थेट परिणाम

**काय आहे अलर्ट?**

२.२५.२१.७३पेक्षा जुन्या iOS आवृत्त्यांसाठी WhatsApp, २.२५.२१.७८पेक्षा जुन्या iOS आवृत्त्यांसाठी WhatsApp व्यवसाय, २.२५.२१.७८पेक्षा जुन्या Mac आवृत्त्यांसाठी WhatsApp

या आवृत्त्या वापरणाऱ्या वापरकर्त्यांना सर्वात जास्त धोका आहे. CERT-Inने सल्ला दिला आहे की सर्व वापरकर्त्यांनी त्यांचे ॲप तात्काळ नवीनतम आवृत्तीमध्ये अपडेट करावे.

**दुहेरी हल्ल्याचा धोका**

CERT-Inने असेही म्हटले आहे की, ही भेद्यता केवळ धोकादायक आहे, परंतु जर ती दुसऱ्या Apple बग (CVE-२०२५-४३३००) सोबत वापरली गेली तर हल्लेखोर अधिक शक्तिशाली होऊ शकतात. याचा अर्थ हॅकर्सना वापरकर्त्यांचा डेटा चोरण्याचे अनेक मार्ग मिळतात.


**सुरक्षित राहण्यासाठी काय करावे?**

WhatsAppच्या नवीनतम आवृत्तीवर अपडेट करा. कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करणे टाळा. ॲप पूर्णपणे अपडेट होईपर्यंत अज्ञात संदेश किंवा URL उघडू नका. सध्या, WhatsAppच्या मूळ कंपनी Metaकडून कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. दरम्यान, कंपनी सहसा सुरक्षेशी संबंधित समस्या लवकर सोडवते.

# कवी, भाषा संशोधक मंजेश्वर गोविंद पै

## निमित्त

आधुनिक कन्नड कवी व एक श्रेष्ठ संशोधक मंजेश्वर गोविंद पै यांचा आज स्मृतीदिन आहे. जन्म कर्नाटकातील द. कॅनरा जिल्ह्यातील मंजेश्वर गावी झाला. शिक्षण बी.ए.पर्यंत झाले असून विविध भारतीय भाषा, जागतिक वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि इतिहास या विषयांचा त्यांनी स्वयंप्रेरणेने व्यासंग केला. विसाहून अधिक भाषा त्यांना उत्तम प्रकारे अवगत होत्या त्यांत ग्रीक व हिब्रू यांचाही समावेश होता. त्यांच्या वाङ्मयीन कारकीर्दीचा काल ६० वर्षांहून अधिक होता.



गोविंद पै यांची पहिली कविता 'सुहासिनी' ही १९०० मध्ये प्रकाशित झाली. परंपरागत द्वितीय प्रासाचा (चरणातील दुसरे अक्षर तेच येणे) उपयोग न करता रचना करणारे गोविंद पै हे पहिले कवी होत. भावगीतांव्यतिरिक्त येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील गोल्गोथा (१९३१) व गौतम बुद्धाच्या जीवनावरील वैशाखि (१९४९) ही दोन खंडकाव्येही त्यांनी लिहिली. त्यांची निवडक भावगीते गिळिविंडु (१९३०) या संग्रहात आहेत. हेब्बेरळू (१९४६) व चित्रमानु (१९४९) ही त्यांची दोन नाटके. यांपैकी पहिले नाटक एकलव्याच्या कथेवरील आहे व दूसरे १९४२ च्या छोडो भारत आंदोलनातील एका हुतात्म्याच्या जीवनावर आधारलेले आहे. काही जपानी 'नो' नाट्यांचाही त्यांनी कन्नड अनुवाद केलेला आहे.

गोविंद पै यांच्या संशोधनपर लेखांची संख्या १६० हून अधिक भरते. त्यांत कर्नाटक आणि तुळुनाडू यांचे इतिहास, प्राचीन भारत-ग्रीस संबंध, इतिहासकालीन राजांची, गौतम बुद्ध, महावीर यांसारख्या धर्मप्रवर्तकांची आणि प्राचीन कन्नड लेखक-कवींची कालनिश्चिती इ. विषयांचा समावेश होतो. धारवाड येथील 'कन्नड संशोधन संस्थे'त दिलेली त्यांची खास व्याख्याने मुरु उपन्यासगळु (१९४०) या नावाने संगृहीत करण्यात आलेली आहेत.


सर्जनशील साहित्य व ऐतिहासिक संशोधन या दोन्हीही क्षेत्रांत गोविंद पै यांना सारखीच गती होती. देशभक्ती व सर्वधर्मीय सुसंवाद साधण्याची दृष्टी ह्या त्यांच्या कर्तृत्वाच्या प्रेरणा होत. याहीपेक्षा ते मानवतावादी होते, हे अधिक महत्त्वाचे होय. ते स्वभावाने प्रसिद्धिपराङ्मुख होते. ही सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेली दिसतात. त्यांची भाषाशैली सहजसुबोध नाही तथापि त्यांचा वैचारिक आशय उच्च कोटीतील असल्याने त्याला एक प्रकारचे शाश्वत मूल्य प्राप्त झालेले आहे.

मद्रास राज्यशासनातर्फे त्यांना १९४८ मध्ये 'राष्ट्रकवि' हा बहुमानाचा पुरस्कार देण्यात आला. १९५० मध्ये मुंबई येथे भरलेल्या अखिल कन्नड साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मंगलोर येथे त्यांचे निधन झाले.

गोविंद पै यांनीही त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात या पद्धतीचे पालन केले. त्यांची पहिली कविता सुवासिनी त्याच नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित झाली. स्वदेशाभिमानी मध्ये प्रकाशित झालेल्या पहिल्या कविता सुभद्रा विलापा आणि कालिया मर्दाना होत्या.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# उशीर होण्याआधी ओळखा बालकांमधील दृष्टीदोष

अलीकडील काही वर्षांमध्ये बालकांच्या डोळ्यांशी संबंधित तक्रारींमध्ये चिंताजनक वाढ लक्षात येत आहे. 'ऑर्बिस'च्या २०२० च्या अहवालानुसार, भारतात शून्य ते १५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ हजारांपैकी १ मूल अंध आहे. भारतासारख्या एका देशात अंध मुलांची ही सर्वात मोठी संख्या आहे. आजच्या डिजिटल युगात मुले तासन्तास वेळ हा पुस्तके, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि स्क्रीन यांच्यासोबत घालवतात. पालकही त्यांचा अभ्यास, खाणेपिणे व शारीरिक वाढीकडे लक्ष देतात, मात्र यामध्ये त्यांच्या आरोग्याचा महत्त्वाचा भाग असलेल्या 'डोळे' या अवयवाकडे सोईस्कररीत्या दुर्लक्षित होते.



नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. निशा चौहान यांनी सांगितले की, मुलांकडून वारंवार डोळे चोळणे, टीव्ही पाहताना किंवा वाचन करताना डोळे बारीक करणे, डोके वाकवणे किंवा एक डोळा झाकणे ही तशी पाहता सामान्य वाटणारी लक्षणे खरेतर तुमच्या मुलांमध्ये दृष्टिदोष असल्याची चिन्हे असू शकतात. स्क्रीनच्या जवळ बसणे, वारंवार पापण्यांची उघडझाप करणे, जवळचे काम टाळणे, फळ्यावरून पाहून लिहिताना चुका करणे किंवा ते करताना त्रास होणे ही देखील न ओळखलेल्या डोळ्यांच्या समस्या असू शकतात. पालकांना मुलांचे हे वागणे किंवा लक्षणे यांना थकवा, आळशीपणा किंवा लक्ष न देणे याचे लेबल लावतात. परंतु प्रत्यक्षात हे डोळ्यांची समस्या असल्याचा लवकर मिळणारा इशारा असू शकतो.

मुलांचे डोळे सुरक्षित ठेवणे हे अवघड काम नाही. त्यासाठी २०-२०-२० हा नियम अवलंब करावा. म्हणजे प्रत्येक २० मिनिटांच्या स्क्रीन टाइमनंतर, २० सेकंद २० फूट दूरच्या वस्तूकडे पाहावे. २ वर्षांखालील मुलांना स्क्रीन टाळावी. २ ते ५ वयाच्या मुलांसाठी दिवसाला जास्तीत जास्त १ तास स्क्रीन, तर मोठ्या मुलांसाठी २ तासांपेक्षा जास्त स्क्रीन पाहायला देऊ नका.

मुलांमधील डोळ्यांच्या बाबत छोटी - छोटी लक्षणे ओळखून, त्यांच्यामध्ये निरोगी सवयी जोपासून आणि नियमित नेत्रतपासणीला प्राधान्य देऊन पालक आपल्या मुलांना केवळ स्वच्छ दृष्टीच नव्हे तर अभ्यास, खेळ व दैनंदिन जीवनातही प्रगती करण्यास मदत करू शकतात. शेवटी, आजचे निरोगी

# विक्रमी वार्षिक कर भरणा; ५०० कोटींपेक्षा जास्त मालमत्ता कर वसुली

## शास्तीतून पनवेलकरांनी मिळवली १०० कोटींहून अधिक सूट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत सुरू असलेल्या अभय योजनेला पनवेलकरांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांचा मालमत्ता कर भरण्याकडे कल वाढला असून आतापर्यंत ५०० कोटींपेक्षा अधिक रकमेचा मालमत्ता कर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. अभय योजनेचा लाभ घेत नागरिकांनी एकूण १०० कोटींपेक्षा जास्त रकमेची शास्तीमाफी मिळवली आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे महापालिकेने मालमत्ता करधारकांसाठी अभय



योजना सुरू केली असून महानगरपालिकेने नुकतीच या योजनेस मुदतवाढ दिली आहे. या योजनेंर्गत १५ सप्टेंबर पर्यन्त मालमत्ता करावरील शास्तीवर ९० टक्के सूट मिळणार असून १६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत ७५ टक्के सूट मिळणार आहे.

### कर भरण्यासाठी डिजिटल पद्धतीस प्रोत्साहन

महापालिकेच्यावतीने करदात्यांना डिजिटल पद्धतींचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जात असून ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी वेबसाईट बरोबरच झचउ ढ-द -झझ, पनवेल कनेक्ट पद्वारे सुलभरीत्या कर भरणे शक्य झाले आहे. याशिवाय 'करमित्र चॅटबॉट' देखील सुरू केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.

### ऑनलाईन भरल्यास २ टक्के सवलत

पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईट, PMC T-X -PP अथवा पनवेल कनेक्ट पद्वारे नागरिकांनी मालमत्ता कर ऑनलाईन भरल्यास त्यांना २ टक्के सवलत मिळेल. नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर लवकरात लवकर भरावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे आणि उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

## पोलीस उपायुक्त कार्यालयाचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईचा वाढता भौगोलिक विकास, त्याचबरोबर वाढणारी लोकसंख्या, या अनुषंगाने नवी मुंबईत तीन परिमंडळ स्थापन करण्यात आले आहेत. यातील परिमंडळ दोनच्या कार्यालयाचे उद्घाटन नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केले आहे.

नवी मुंबई शहर हे दिवसेंदिवस झपाट्याने विकसित होणारे शहर आहे. सर्व पायाभूत सुविधांनी युक्त अशी नवी मुंबई शहराची ओळख आहे. या शहरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्र, आयटी पार्क, आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ, व आता नव्याने होऊ घातलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, आहेत तसेच सुनियोजित शहर असल्याने या नवी मुंबई शहरात नागरिकांचा कल मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राहण्यासाठी नागरिकांच्या पसंती मध्ये अव्वल स्थानी नवी मुंबई शहर आहे. या विकसित व सुनियोजित शहरात शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडून तिसऱ्या परिमंडळाची स्थापना करण्यात आली आहे. परिमंडळ दोनच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नुकतेच केले आहे.

पोलीस उपायुक्त परिमंडळ दोनचे कार्यालय हे एनआरआय पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर सुरू करण्यात आले आहे. परिमंडळ दोनच्या अंतर्गत सहाय्यक पोलीस आयुक्त सीबीडी व सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट या कार्यालयांचा समावेश आहे.

## आदर्श युवा मित्र मंडळातर्फे खेळ पैठणीचा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श युवा मित्र मंडळ सेक्टर ४ कळंबोली आयोजित गणेशोत्सव मंडळ आठरावे वर्ष साजरे करीत आहे. दरवर्षीप्रमाणे मंडळ विविध उपक्रम राबवित आहे यावर्षीही लहान मुलांचे खेळ त्याचप्रमाणे श्री स्वामी समर्थ मंदिर सेक्टर ४ येथे महिलांच्या मनोरंजनासाठी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता

या कार्यक्रमात परिसरातील अनेक महिलांनी सहभाग घेतला अंतिम तीन महिला विजेत्यांना मंडळाचे उपाध्यक्ष बबन बारगजे व भाजप कळंबोली मंडळ चिटणीस बायजा बारगजे यांच्यातर्फे पैठणी प्रायोजित



करण्यात आली होती. प्रियांका चव्हाण या प्रथम, अंजना तांबे द्वितीय तर शितल बापूराव दराडे या तृतीय पारितोषिक विजेत्या ठरल्या. बक्षीस वितरण मंडळाचे सल्लागार अशोक मोटे व भाजपा कळंबोली मंडळ सरचिटणीस दिलीप बीस्ट कळंबोली मंडळ सचिव बायजा बबन बारगजे उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष नागेश केसकर, उपाध्यक्ष बबन बारगजे, खजिनदार प्रशांत देवकर, सचिव आशिष फुटाणे लहूशेठ मलकमीर, सचिन पवार, शुभम टिंगरे, महेश बारगजे, कृष्णा गर्जे, दत्ता चौधरी, अभिजीत खडसरे, गणेश पिसाळ, रोहित माने, बबलू पोटे, प्रदीप दाते, ऋषी पोटे, अक्षय गर्जे, सुमीत मलकमीर आदी उपस्थित होते.

## पनवेल परिसरात १०,६१२ बाप्पांचे होणार आज विसर्जन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

अनंत चतुर्दशी निमित्ताने पनवेल परिसरातील दहा हजार सहाशे १२ गणपती बाप्पांचे आज विसर्जन होणार आहे. गणपती बाप्पांच्या आगमन झाल्यापासून घरोघरी आनंदाचे आणि मंगलमय वातावरण होते. दहा दिवस बाप्पांचे आगमन झाल्यानंतर आज विसर्जनाचा अकरावा दिवस उजाडला.

आज बाप्पांचे ठिकठिकाणच्या नदी, तलावात, कृत्रिम तलावात, समुद्रात विसर्जन केले जाणार आहे. पनवेलमध्ये १९० सार्वजनिक गणपती बाप्पा आणि दहा हजार ४२२ खाजगी बाप्पांचे विसर्जन होणार आहे. पनवेल नगरपालिकेने ठीकठिकाणी कृत्रिम तलाव उभारले आहे तर ग्रामीण भागात नदी आणि तलावामध्ये बाप्पांचे विसर्जन केले जाते.

| पोलीस स्टेशन | सार्वजनिक | खासगी |
|---|---|---|
| पनवेल शहर | २७ | १३५० |
| पनवेल तालुका | २२ | ११५० |
| खांदेश्वर | २१ | ३३४४ |
| कामोठे | ३३ | १५०० |
| कळंबोली | ३८ | १२५० |
| तळोजा | १८ | ६५८ |
| खारघर | ३१ | ११७० |

## उरण महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात शिक्षक दिनाचे आयोजन केले गेले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गरजे सर यांनी वर्तमान काळात समाजातील संवेदना बोथट होत असून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाप्रती कृतज्ञ राहिले पाहिजे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपली जडणघडण केली पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून भूगोल विभाग प्रमुख डॉ. ए.के. गायकवाड उपस्थित



होते. त्यांनी आपला पहिला गुरु आपली आई असून आईने दिलेले संस्कार हे जीवनात मार्गदर्शक ठरतात असे सांगितले तर इतिहास विभाग प्रमुख डॉ.एम.जी. लोणे यांनी भारतीय इतिहासात शिक्षकाची भूमिका याविषयीचे दाखले देत विद्यार्थ्यांना शिक्षकाचे महत्त्व सांगितले. यावेळी कु. सुलेहा सलमान या विद्यार्थिनीने आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार कु. योगिनी म्हात्रे हिने व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रा. रामकृष्ण ठावरे, प्रा.सौ.विनेता तांडेल महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

**पनवेल :** पनवेलजवळील पाडेघर गव्हाण फाटासमोर रेल्वे पटरीच्या मध्ये एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर अनोळखी पुरुष इसमाचे अंदाजे ३४ वर्षे, दोन्ही पाय सरळ, डोक्याचे केस काळे, दाढी मिशी नॉर्मल सफेद व काळी वाढलेली, सडपातळ बांधा, उंची अंदाजे ५ फूट ४ इंच सदर इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहा. पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## करंजाडेतून तरुणी बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे शिवमंदिर येथील राहते घरातुन कोणास कांही एक न सांगता एक तरुणी कोठेतरी निघुन गेली ती अद्याप पर्यंत घरी परत आली नाही.

मुलीचे नाव सलोनी कमल कानले (वय १९ वर्षे), उंची-४.५ फुट अंदाजे, बांधा सडपातळ, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे वाढलेले, अंगात पांढऱ्या रंगाचा टॉप व त्यावर फुलपाखरांचे चित्र व लाल रंगाची लेगीन तसेच भाषा हिंदी, भाषा बोलणारी आहे. या मुलींबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा.

## व्यावसायिकाची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** बेटिंगचे आमिष दाखवून खारघरमधील एका बांधकाम व्यावसायिकाची तब्बल एक कोटी २३ लाख ८५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. याबाबत नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे बांधकाम व्यावसायिक हे खारघर येथील तुलसी सोसायटीत राहतात. त्यांना ऑगस्ट महिन्यात एका महिलेने संपर्क साधून त्यांना बेटिंगसाठी तयार केले.



पनवेल नेरेपाडा येथील मयूर गुरुनाथ तांबडे यांच्या घरचा बाप्पा.

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पडताळणी करा'

**उरण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी अर्ज केलेला आहे अशापैकी राज्य स्तरावर करण्यात आलेल्या छाननीमध्ये अपात्र आढळलेल्या लाभार्थ्यांची पडताळणी करण्यासाठी संबधित लाभार्थ्यांचे लाभ देणे तात्पुरते थांबविण्यात आले आहे. लाभ थांबविण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये १ आधारकार्डप्रमाणे २१ वर्षे वयापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. तर रेशनकार्डनुसार ज्या कुटूंबात दोन पेक्षा जास्त महिलांना लाभ मिळत आहे,अशा कुटूंबात महिलांचा समावेश आहे.

सबंधित लाभार्थ्यांचे या संदर्भात तसेच कुटूंबात दोनपेक्षा जास्त लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची महिला व बालविकास विभागाकडून पडताळणी सुरु आहे. सदर पडताळणीनंतर जे लाभार्थी पात्र असतील त्यांचा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ पुन्हा सुरु करण्यात येणार आहे. करिता ज्या लाभार्थ्यांचा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत मिळणारा लाभतात्पुरता बंद झाला आहे. अशा महिला लाभार्थी यांनी आपल्या गावातील अंगणवाडी सेविका यांच्याशी सपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रायगड श्रीकांत हावळे यांनी केले आहे.

## गोष्ट धमाल गावाची नाटकाच्या हस्तलिखिताचे प्रकाशन

**उरण : बातमीदार**

प्रसिद्ध नाटककार किशोर पाटील यांच्या गोष्ट धमाल गावाची या नाटकाच्या हस्तलिखित प्रतीचे पूजन रायगड भूषण प्रा.एल बी पाटील यांनी आणि प्रकाशन जीवन गावंड यांच्या हस्ते झाले. तसेच एकविरा आई या गाण्याच्या ध्वनिचित्र प्रतीचे प्रकाशन मुकुंद गावंड आणि सरपंच कलावती पाटील यांच्या शुभहस्ते झाले.



या वेळी आपल्या भाषणात रायगड भूषण प्रा.एल.बी पाटील म्हणाले की, किशोर पाटील हे एक रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य नाट्यलेखक आहेत. हाय रे हाय, हाऱ्या मारतोय हेलपाट्या या नाटकांच्या यशा नंतर हे नाटक मोठे यश मिळविले. याचवेळी मुकूंद गावंड म्हणाले की, नाटक रंगमंचावर आणण्यासाठी धमक असावी लागते, ती धमक शिवशंकर नाट्य मंडळाकडे असून आम्हा मंडळींचे संपूर्ण सहकार्य राहील. हा कार्यक्रम पिरकोन या गावी झाला.या वेळी दिनेश गाताडी, महेंद्र गावंड, धिरेंद्र ठाकूर, जगदीश गावंड, अमृत म्हात्रे, राजेंद्र गावंड, एकनाथ म्हात्रे, छगन गावंड इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

## ठाणे-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग साकारणार

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे आणि नवी मुंबईतील प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मुंबई महानगर प्रदेशात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जलद कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी ऑगस्ट २०२५ मध्ये या रस्त्यासाठी राज्य सरकारने मंजुरी महत्त्वाकांक्षी प्रकल्पास सिडकोच्या वतीने हाती घेतला आहे. ठाणे-शिळफाटा आणि काशेळी यांना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणारा एक नवा उन्नत मार्ग लवकरच उभारला जाणार आहे. ठाणे बेलापूर मार्गावरील वाहतूक कमी होण्यास मोठी मदत होईल.

हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. याचा अर्थ, खासगी कंपनी हा मार्ग स्वतःच्या खर्चाने बांधेल, ठराविक कालावधीसाठी त्याचे व्यवस्थापन करेल आणि टोलच्या माध्यमातून आपला खर्च वसूल करेल. त्यानंतर हा मार्ग सरकारकडे हस्तांतरित केला जाईल. या बीओटी मॉडेलमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने होण्यास मदत होते.

या उन्नत मार्गामुळे ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि आसपासच्या भागातील प्रवाशांना थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचणे सोपे होणार आहे. सध्या या मार्गावरील प्रवासाला १ ते २ तास लागतात, पण हा उन्नत मार्ग सुरू झाल्यावर हा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. हा प्रकल्प सिडको आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने राबवला जात आहे. आगामी काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यावर वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरेल.

सुरुवातीला या प्रकल्पाचा खर्च सुमारे ३,००० कोटी रुपये होता, परंतु सध्याच्या अंदाजानुसार हा खर्च ६,५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले भूसंपादन लवकरच पूर्ण केले जाईल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे केवळ वाहतूक कोंडी कमी होणार नाही, तर परिसराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

हा प्रकल्प लवकरच सुरू होऊन पूर्ण झाल्यावर मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेत एक मोठे बदल घडवेल, अशी अपेक्षा आहे.



## शुद्धीपत्रक

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/कोशिंबळे त. निजामपूर/एसआर-९५/२०१२ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/एसआर-९५/२०१२ दिनांक २६/०४/२०१६, २८/०९/२०१७, २४/०८/२०१८ व २४/०५/२०२२ अन्वये मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जिल्हा रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसूचना स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१६ ते २०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या आहेत;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०२०/प्र.क्र.४६/उद्योग-१४ दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये मौजे-कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील काही सर्व्हे नंबर मधील हिस्से व क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०३ ते ०४ मध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१६ ते २०२२ मध्ये प्रसिध्द झालेल्या कलम ३२(१) ची अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

पाणसई औद्योगिक क्षेत्र

जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव कोशिंबळे तर्फे निजामपूर

| यापूर्वीचा तपशिल | | | वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व्हे नंबर / गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर) | सर्व्हे नंबर / गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर) |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| १ | ८ | ०.३०३० | १ | ८ | ०.३३०० |
| ३७ | ४ पै | ०.०१२० | ३७ | ४ | ०.०१३० |
| ४८ | ८ | ०.७४०० | ४८ | ८ | ०.८४०० |
| ५० | ६ | ०.९३०० | ५० | ६ | १.०९०० |
| ५० | ११ | ०.४५०० | ५० | ११ | ०.९८०० |
| ५० | १२ पै | ०.१८०० | ५० | १२ | ०.४५०० |

ठिकाण - माणगांव


दिनांक - २८/०८/२०२५

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग माणगांव

जिमाका/रायगड/जाहिरात/१४१/११८५/२०२५

# गणेश दर्शन






पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेल येथील अष्टविनायक मित्र मंडळाच्या गणरायाचे दर्शन घेतले. मंडळाकडून त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी नगरसेवक अनिल भगत, जिल्हा चिटणीस अमरिश मोकल, मयुरेश खिस्मतराव आदी उपस्थित होते.












पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी परिसरातील गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, मंडळाचे सदस्य, भाविक उपस्थित होते.








पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी परिसरातील घरगुती व सार्वजनिक गणपतींचे दर्शन घेतले.

राम प्रहर

दिवाळी २०२५

मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# मुरुड आगरात गॅस पंप सुरु करा

## खासदार सुनील तटकरेंचे अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश

**मुरुड : प्रतिनिधी**

एसटीने मुरुड येथे जलद गतीने पोहचण्यासाठी मुरुड आगारात महानगर गॅस पंप जलद गतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. यासाठी संबंधित सर्व अधिकारीवर्गाने तिथे जाऊन तातडीने पहाणी करून गॅस पंपाचे काम जलद गतीने पूर्ण करण्यात यावेत, असे आदेश रायगडचे खासदार तथा केंद्र शासनाच्या पेट्रोलियम अ‍ॅण्ड नॅचरल गॅस चेअरमन सुनील तटकरे यांनी दिले आहेत.



मुरुड तालुका हा पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण तालुका असून येथे दरवर्षी लाखो पर्यटक भेटी देत असतात. काशीद समुद्र किनारा; त्याचप्रमाणे मुरुड समुद्र किनारा व येथे असणारा ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी देशाच्या विभिन्न भागातून पर्यटक मोठ्या संख्येने येण्याचे प्रमाण आहे. मुंबई ,ठाणे व अन्य भागातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूप मोठी असून काही पर्यटक एसटीचासुद्धा वापर करीत असतात.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी मंत्रालय येथे खासदार सुनील तटकरे यांच्यासमवेत महावितरण गॅस लिमिटेड व एसटी महामंडळाचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, मुरुड तालुका अध्यक्ष फैरोझ घलटे, तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, वावडुंगी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजित कासार, आगरदांडा ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर, कोळी समाज नेते प्रकाश सरपाटील, युवा कार्यकर्ते निखिल पाडगे आदी उपस्थित होते.

या वेळी उपस्थित महानगर गॅस ॲथॉरिटी कंपनीचे अधिकारी व एसटी महामंडळातील अधिकारीवर्गाने येत्या दोन दिवसाच्या आत मुरुड आगाराची पाहणी करून गॅस पंप यासाठी सुनियोजित जागा निश्चित करून तातडीने गॅस पंप होण्यासाठी जलद गतीने काम पूर्ण करण्याचे आदेश खासदार तटकरे यांनी दिले.

कोणत्याही परिस्थिती हे काम जलद गतीने होण्यासाठी अधिकारीवर्गाने तत्परता दाखवावी व असंख्य प्रवासी वर्गालादिलासा द्यावा, असेही ते म्हणाले.

# रेवदंड्यात ऑनलाईन पेमेंटच्या खोट्या मेसेजद्वारे फसवणूक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील इलेक्ट्रॉनिक्स दुकानात विक्रेत्याला ऑनलाईन पेमेंट दिले, मात्र ऑनलाईन पेमेंटला देयक रकमेच्या खोट्या मेसेजने गंडविले. ऑनलाईन पेमेंटची रक्कम मिळाली की नाही हे पहातानाच ग्राहकाने त्वरीत तेथून पोबारा केला व भरदिवसा इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रेत्याची आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली.

रेवदंडा बाजारपेठेत २ सप्टेबर २०२५ रोजी दुपारी २.४५च्या सुमारास राहूल राजेंद्र जैन यांच्या मालकीच्या राहुल इलेक्ट्रॉनिक्स या दुकानात एका ग्राहकाने सॅमकॉन कंपनीचा स्पिकर सेट ७५०० रुपये किमतीमध्ये खरेदी केला. या वेळी खरेदी केलेल्या वस्तूची रक्कम देण्यासाठी प्रथम भ्रमणध्वनी स्कॅनरवर खरेदी रक्कम देण्याचा बहाणा केला,



परंतु तेथे नेटवर्क मिळत नसल्याची तक्रार करून त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स दुकानातील संगीता राजेंद जैन यांचेकडे भ्रमणध्वनी क्रमांक मागितला. त्यानुसार त्यांनी भ्रमणध्वनीने ऑनलाईन गुगल पे व्दारे खरेदीची ७५०० रुपये रक्कम पाठविली. त्या पाठविलेल्या रक्कमेचा मेसेजसुध्दा त्यांनी दुकानातील संगीता जैन यांना दाखविला. या वेळी ग्राहकाने पाठविलेली रक्कम अकाउंटमध्ये जमा झाल्याचे पहात असतानाच रक्कम अकाउंटमध्ये जमा झाली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आले.

दरम्यान, आर्थिक फसवणूक करणाऱ्या अज्ञाताने तेथून त्वरेने बाहेर ठेवलेल्या मोटरसायकलने पोबारा केला. मोटरसायकलस्वार रेवदंडा मोठे बंदरमार्गे गेला असल्याने राजेंद्र जैन यांनी पाठलाग केला, परंतू साळाव चेकपोस्टनंतर अज्ञात चोरटा कोणत्या रस्त्याने गेला, हे कळून न आल्याने राजेंद्र जैन यांचा पाठलाग यशस्वी झाला नाही.

मोटरसायकलने पलायन केलेल्या अज्ञात चोरटयांचे छायाचित्र सीसीटीव्हीमध्ये मिळाले आहे असून पलायन केलेल्या मोटरसायकलला दोन्ही नंबर प्लेट नसल्याचे सीसीटीव्हीमध्ये समजते.

या फसवणूक करणाऱ्या अज्ञाताचे चोरट्याविरोधात इलेक्ट्रॉनिक्स दुकानदार संगीता जैन यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे आर्थिक फसवणुकीबाबत तक्रार केली आहे. त्यानुसार अधिक तपास सुरू आहे.



भाजप खालापूर पश्चिम मंडळ उपाध्यक्ष माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांचा गणराय.

# अमृत आणि एमसीईडीमार्फत मोफत प्रशिक्षण कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रभोधिनी (अमृत), पुणे आणि उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमृत लक्षित गटातील (ब्राह्मण, बनिया, राजपुरोहित, कायस्थ, एयंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, गुजराती, सिंधी, राजपुत, कोमटी, जाट, कानबी) आदी उमेदवारांसाठी विविध निःशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्ह्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक, रायगड-अलिबाग महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी, (अमृत) शैलेश विनायक मराठे यांनी दिली.

लक्षित गटातील युवक आणि युवतींसाठी अमृत-सुर्यमित्र (सौर), अमृत-आयात निर्यात आणि अमृत-निवास उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (ईडीपी २१ दिवस), अमृत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (टीईडीपी-३० दिवस) आणि अमृत क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम (सहा दिवस) हे तीन प्रकारचे प्रशिक्षण अनिवासी स्वरूपात होणार आहे.

जे तांत्रिक प्रशिक्षण आहेत त्या संबंधित ट्रेडचे संपूर्ण प्रात्यक्षिक होणार असून सर्व ट्रेनिंगमध्ये जे तांत्रिक प्रशिक्षण आहेत तसेच उद्योजकीय मार्गदर्शन, व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक, व्यवस्थापकीय आणि कायदेशीर माहिती, मार्केटिंग कौशल्य ग्राहकांशी संबंध तयार करून बाजारात व्यवसाय वाढविण्याचे तंत्र, शासनाच्या विविध योजना, बँकिंग प्रकल्प अहवाल, उद्योगात लागणारे कागदपत्रे, उद्योजकीय मानसिकता, उद्योजकीय गुणसंपदा इ. विषयांवर तज्ञामार्फत मार्गदर्शन होणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व्यवसाय उभारण्यासाठी एमसीईडीमार्फत पाठपुरावा केला जाणार असून प्रशिक्षणानंतर मोफत मार्गदर्शन मिळणार आहे.

अमृत लक्षित गटातील किमान आठवी पास, कोणत्याही शासकीय कागदपत्रावर जातीचा उल्लेख, तहसीलदार याचे रहिवासी दाखला आणि उत्पन्नाचा दाखला इ. असणारे अमृत लक्षित गटातील इच्छुक उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. यासाठी अमृत रायगड जिल्हा कार्यालय अलिबाग, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) कार्यालयाच्या बाजूला, अलिबाग, रायगड येथे निवड प्रक्रिया सुरू आहे.

अमृत लक्षित गटातील लाभार्थींची मुलाखतीव्दारे निवड होणार असून आनंद विद्यागर एमसीईडी प्रकल्प अधिकारी, रायगड (९४०३०७८७७२) किंवा शैलेश विनायक मराठे, जिल्हा व्यवस्थापक अमृत, अलिबाग रायगड, ९११२२२८७५९ यांच्याशी संपर्क साधून निःशुल्क प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त युवक, युवती व उद्योजक तथा नवउद्योजक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन दत्तात्रेय थारवे, विभागीय अधिकारी, कोकण विभाग (कोकण भवन) व श्रीकांत कुलकर्णी, राज्य समन्वयक एमसीईडी यांनी केले आहे.

# खोपोली मराठा समाजाचा जल्लोष

**खोपोली : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे याकरिता संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आझाद मैदान येथे उपोषण केले होते, ते उपोषण यशस्वी झाले. या पार्श्वभूमीवर खोपोलीत काल सायंकाळी शिळफाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत, व गुलाल उधळीत मोठा जल्लोष केला. यात महिला कार्यकर्त्यांची संख्या लक्षणीय होती.



या वेळी एक मराठा, लाख मराठा, कोटी मराठा या गरजेने आसमंत दणाणला. प्रारंभी मराठा संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर कार्यकर्त्यांनी चौकात फटाक्यांची आताषबाजी केली, जोरदार घोषणा देण्यात आल्या.

डॉ. सुनील पाटील यांनी या मराठा आरक्षण संघर्षाची कहाणी थोडक्यात विषद केली. त्यांनी कार्यकर्त्यांनी एकजूट आणि संयम दाखविला याबाबत समस्त महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे त्याचप्रमाणे शासनाचे विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

शिवसेनेच्या माजी उपनगराध्यक्ष विनिता कांबळे यांनीही या वेळी आपले विचार मांडले. निखिल थरकुडे यांनी पोवाडा सादर केला. त्यानंतर सर्व कार्यकर्ते डीजेच्या तालावर थिरकले.

या वेळी मराठा आरक्षण संघर्ष समितीचे उत्तम भोईर, कार्यकर्ते किरण हडप, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, हरीश काळे, माजी नगरसेवक नितीन मोरे, संघर्ष समितीच्या महिला नेत्या धनश्री, माजी नगरसेविका सुर्वे, वैशाली जाधव, भाऊ सणस यांचयासह अनेक मराठा आरक्षण संघर्ष समितीचे कार्यकर्ते तसेच खोपोलीतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हसळ्यात कारच्या धडकेत महिला ठार

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा-श्रीवर्धन रस्त्यावर वाडांबा गावानजीक पादचारी महिलेला कारचालकाने जोरदार धडक मारली. या अपघातात महिला जागीच ठार झाल्याची घटना शुक्रवारी (दि. ५) सकाळी १०.३० वाजता घडली.

किशोरी किसन जावळेकर (वय ४०, रा. केलटे, ता. म्हसळा) ही महिला सकाळी चिखलप (ता.श्रीवर्धन) येथून केलटे येथे येत असताना वाडांबा गावानजीक एसटी बसमधून उतरून रस्ता क्रॉस करत असताना म्हसळ्याकडून येणाऱ्या भरधाव कारने महिलेला धडक दिली. म्हसळ्याकडून एमएच ०३-बीसी ९४६२ ही कार भरधाव बेदरकारपणे श्रीवर्धनकडे जात असताना कारने धडक दिल्याने महिलेचा जागीच मृत्यू झाला. अपघाताचे वृत्त कळताच म्हसळ्याचे पोलीस सबइनस्पेक्टर ज्ञानेश्वर ऐडवळे, नवनाथ दामोदर देवढे, शौकत मुल्ला, चालक अनिकेत पोळ यानी अपघातग्रस्त मयत आणि अन्य एका महिलेला ग्रामिण रुग्णालयात दाखल केले.

ग्रामीण रुगणालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.करण बेलकोने यांनी महिलेला तपासून मृत घोषित केले, तर अन्य एका जखमी महिलेवर उपचार सुरु असल्याचे सांगण्यात आले.

कारचालक रोहन संतोष पाटील (वय २२, रा. वाकडाई नगर, माणगाव) याला पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतल्याचे म्हसळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक संदीप कहाळे यानी सांगितले.

# इकोफ्रेंडली गणपती स्पर्धेत मीनल गायकर प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीतर्फे आयोजित केलेल्या इकोफ्रेंडली गणेशोत्सव सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक मीनल संतोष गायकर, वरची खोपोली यांनी पटकावला.

खोपोली परिसरातून १७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता तसेच मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, ठाणे, घाटकोपर, चिपळूण, गोवा येथूनसुद्धा १६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता, परंतु ही स्पर्धा खोपोलीसाठी मर्यादित असल्यामुळे, बाहेरगावाहून आलेल्या स्पर्धकांना रोटरी क्लब खोपोलीतर्फे सर्टिफिकेट देण्यात येणार आहेत.

दुसरा क्रमांक भावेश शेडगे शास्त्रीनगर,तिसरा क्रमांक ऋतुजा अनिल महाले काजूवाडी, उत्तेजनार्थ पारितोषिक अविनाश राऊत व राजश्री मुडदा यांनी मिळविले. विजयी स्पर्धकांना रोटरी क्लब खोपोलीतर्फे ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. स्पर्धा खोपोलीसाठी मर्यादित असल्यामुळे, बाहेरगावाहून आलेल्या स्पर्धकांना सर्टिफिकेट देण्यात येणार आहेत.

स्पर्धेचे परीक्षण रोटरी क्लब अध्यक्ष सुनीता चव्हाण, सेक्रेटरी डॉ. नलिनी रामस्वामी, संजय पाटील, रोहित भल्ला, दीपक पाटील, कविता खोपकर व सर्वोदय तिवारी यांनी पाहिले.



# माथेरानमध्ये गणेश सजावट स्पर्धेला प्रतिसाद

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान प्रेस क्लबच्या वतीने येथील जेष्ठ पत्रकार दिवंगत संतोष पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शहरातील घरगुती गणेश सजावट स्पर्धेचे आयोजन यंदाच्या वर्षीदेखील करण्यात आले होते. या स्पर्धेला गणेशभक्तांनी मोठा प्रतिसाद दिला. हेमंत पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचा उभारलेला देखावा हा प्रथम क्रमांकाचा ठरला असून सागर जोशी यांनी द्वितीय, तर स्वप्नील कळंबे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.




चाळीसपेक्षा अधिक जणांनी स्पर्धेत सहभाग घेतला. संत रोहिदासनगरमधील हेमंत पवार यांनी उभारलेला छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास सांगणारा देखावा अत्यंत सुंदर होता. या देखाव्याला प्रथम क्रमांक मिळाला. पंचवटीनगरमधील रहिवासी असलेले सागर जोशी यांनी शारलोट तलावाचा देखावा तयार केला होता. हुबेहूब येथील मंदिराची प्रतिकृती तयार केली. त्याचबरोबर या तलावात बोटिंग सुरू करा आणि झिपलाईन रिव्हर क्रॉसिंग सुरू करा असा संदेश देखाव्यातून देण्यात आला होता. या देखाव्याला दुसरा क्रमांक देण्यात आला.

स्वप्नील कळंबे यांनी माथेरान घाट रस्त्यात होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत देखावा दाखविला होता. या देखाव्याला तिसरा क्रमांक देण्यात आला आहे. माथेरान प्रेस क्लबच्या सर्व सदस्यांनी प्रत्येक स्पर्धकाच्या घरी जाऊन परीक्षण केले. त्याचबरोबर पाच स्पर्धकांची उत्तेजनार्थ म्हणून निवड करण्यात आली आहे. यामध्ये सखाराम खाडे, दिलीप शिंदे, विकास पाटील, संतोष चव्हाण व हेमंत कारंडे यांचा समावेश आहे.

गौरी सजावट स्पर्धेत प्रियांका अमोल काळे प्रथम, सुरेखा जगदीश साळुंखे द्वितीय, मंदा चंद्रकांत धनावडे तृतीय असे क्रमांक देण्यात आले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण ९ सप्टेंबर रोजी स्व. संतोष पवार यांच्या पुण्यतिथी दिनी होणार असल्याचे माथेरान प्रेस क्लब अध्यक्ष संजय भोसले यांनी सांगितले.

# प्रा. स्वप्नील सकपाळचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठेची मानल्या जाणाऱ्या ४०वी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा जून २०२५ (सेट)मध्ये द. ग. तटकरे महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्रा. स्वप्नील सुरेश सकपाळ याने उत्तम कामगिरी करून यश मिळविले. या यशामुळे त्याचे कौतुक होत आहे.

प्रा. सकपाळ याने मेहनत, चिकाटी आणि शैक्षणिक कौशल्याच्या जोरावर सेट परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने अभ्यास, संशोधन आणि विद्यमान शैक्षणिक कार्यक्षमता यांचा समन्वय साधत हा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी त्याचे हे यश आदर्श ठरत आहे. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आणि समाजातील योगदानासाठी शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, पदाधिकारी नितीन बामगुडे, सुनील पवार, प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर आदी उपस्थित होते.

# रुग्णालयास औषधे देऊन मुलाचा वाढदिवस साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील आदर्श समता नगर येथील तुकाराम करकरे यांचे चिरंजीव स्वप्नील करकरे यांनी आपला मुलगा आर्विक याच्या प्रथम वाढदिवसाचे औचित्य साधून ३ सप्टेंबर रोजी येथील उपजिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक औषधे देऊन वाढदिवस साजरा करत इतरांनाही प्रेरणा दिली.

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे यांच्या ताब्यात औषधे दिली. आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त नवीन पिढीला आदर्श निर्माण करून या दोन्ही उभयतांनी गरजू गरीब रुग्णांना जीवदान देणारी औषधे, इंजेक्शन वेगवेगळ्या स्वरूपात दिली.

ही औषधे व इंजेक्शन डिलिव्हरी, गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त, लकवा, ब्रेन हॅमरेज, हृदयविकार झटका आलेल्या रुग्णांना उपयोगी पडणार आहेत. अत्यावश्यक औषधे दिल्याबद्दल ईरा आणि स्वप्नील करकरे तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष खाडे यांचे कौतुक करीत अर्विकला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



